विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांचे कार्यालय
कोंकण भवन, नवी मुंबई ४००६१४

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस कळविणेत येते की, विभागीय आयुक्त,कोकण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई यांचेकडील खाली नमूद केलेले वाहन निर्लेखित करावयाचे आहे.

| अ.क्र | मोटर वाहन क्रमांक | प्रकार | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|
| १ | MH४३-G-३४९ | टाटा इंडिगो | १७०००/- |

सदरचे वाहन, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथील वाहनतळात उभे केलेले आहे. सदरचे वाहन जसे आहे तसे या तत्वावर वाहन खरेदी करणेस इच्छुक व्यक्तींकडून मोहोरबंद देकार मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुंकांनी सीलबंद लिफाफयातले देकार दि. ३१/१२/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपआयुक्त (सामान्य प्रशासन ) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, पहिला मजला , रुम नं.१०६ ,कोकण भवन नवी मुंबई येथे समक्ष आणून दयावेत. सदर देयकारामध्ये इच्छूक खरेदीदार यांनी सदरचे वाहन खरेदी करण्यास इच्छूक रक्कम मुल्यांकना रकमेपेक्षा अधिक नमुद करणे आवश्यक आहे. कार्यालयात मोहोरबंद देकार समक्ष देतेवेळी अनामत रक्कम रु. ५०००/- जमा करावी. अनामत रक्कम भरल्यानंतर या कार्यालयातून प्राप्त झालेली पावती देकारसोबत जोडणे आवश्यक आहे. उशीरा आलेले देकार स्विकारले जाणार नाहीत. दि. ३१/१२/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वा. सर्व सिलबंद लिफाफे त्यावेळी उपस्थित असतील त्यांचेसमोर उघडले जातील. ज्या इच्छूकाने सर्वात जास्त किंमतीस सदरचे वाहन खरेदी करणेस तयार असलेबाबत अर्जात नमुद केले असेल त्याला सदरचे वाहन विक्री करणेत येईल. सदर खरेदीदाराने खरेदीची किंमत चलनाने शासनाकडे भरणा केलेनंतर सदरचे वाहन त्यांच्या ताब्यात देण्यात येईल. सदरचे वाहन हस्तांतरीत करून घेण्याची जबाबदारी खरेदीदार यांचीच राहील.

क्र./साशा/कार्या-७/रकाप/वा.नि./२०२१
विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन,
दिनांक:- २०/१२/२०२१

(मनोज रानडे)
उपआयुक्त (सामान्य),
कोकण विभाग, कोकण भवन

Scanned with CamScanner